# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा.क्र. ३०९/२०१९    दिनांक १०/०९/२०१९**

## "श्री गणेश विसर्जन निमित्त वाहातुक मार्गात बद्दल"

दिनांक १२.०९.२०१९ रोजी श्री गणेश विसर्जन असल्याने शहराच्या विविध भागातुन श्री च्या मिरवणुका निघणार असुन मुख्य रस्त्यावर मिरवणुकांच्या व वाहानांच्या गर्दीमुळे वाहतुकीची कोंडी होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उदभवु नये या कारणासाठी वाहतुक मार्गात एक दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात बद्दल करण्यात येणार असुन खालील पर्यायी मार्गावरील वाहतुकी वळण देण्यात येणार आहे.

१. जुनामोंढा, देनाबँक, महाविर चौक, तरोडेकर मार्केट, वजिराबाद चौक, कलामंदीर, शिवाजीनगर ते आयटीआय चौका पर्यंत जाण्या-येण्यास बंद .
२. राजकॉर्नरकडुन आयटीआय कडे येण्यासाठी राजकॉर्नर, वर्कशॉप टी पॉईंट, श्रीनगर ते आयटीआय पर्यंत डावी बाजु बंद.
३. राजकॉर्नर ते तरोडा नाकाकडे जाण्यासाठी डावी बाजू बंद.
४. बर्की चौक ते जुनामोंढाकडे येण्यासाठी बंद.
५. जुना मोंढयातुन सिडको हडको जाण्यासाठी बंद.
६. लातुर फाटा येथुन सिडको/हडको कडे जड वाहनासाठी जाण्याऱ्यासाठी बंद.

### पर्यायी मार्ग

१. बर्की चौकाकडुन जुना मोंढयाकडे येणारी वाहतुक महमंद अल्ली (गणेश टॉकीज) रोडचा जाण्या -येण्यासाठी वापर करतील
२. वजिराबाद चौकाकडुन श्रीनगर, वर्कशापकडे जाणारी वाहतुक वजिराबाद चौक, पोलीस मुख्यालय कॉर्नर, लालवाडी, अंडरब्रिज, शिवाजीनगर(पिवळी गीरणी) ते गणेशनगर वाय पॉईंटकडे जाण्या-येण्यासाठी वापर करतील.
३. राजकॉर्नर ते जुनामोंढा मार्गावरील वाहतुक राजकॉर्नर, वर्कशॉप कॉर्नर, भाग्यनगर, आनंदनगर, नागार्जुना टी पॉईंट, अण्णाभाऊ साठे चौक, यात्रीनिवास पोलीस चौकी, अबचलनगर ते पुढे जाण्या -येण्यास वापर करतील.
४. गोवर्धनघाट पुलावरुन नांदेड शहरात येणारी वाहतुक पोलीस मुख्यालय कॉर्नर, लालवाडी अंडरब्रिज, शिवाजीनगर (पिवळी गीरणी) ते गणेशनगर वाय पॉईंटकडे जाण्यासाठी वापर करतील.
५. सिडको / हडकोकडुन येणारी वाहतुक साईकमान, गोवर्धनघाट नविन पुल, तिरंगा चोक पोलीस मुख्यालय कॉर्नर, लालवाडी अंडरब्रिज, शिवाजीनगर (पिवळी गीरणी) ते गणेशनगर वाय पॉईंटकडे जाण्यासाठी वापर करतील.
६. लातुर फाटा ते दुध डेअरी, धनेगाव चौक या मार्गाचा जड वाहनासाठी वापर करतील.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. ३१०/२०१९ दिनांक १०/०९/२०१९**

**रिंधा चा साथीदार आकाशसिंह जगतसिंह गाडीवाले यास नांदेड पोलीसांनी घेतले ताब्यात**

नांदेड जिल्हयात व पंजाब राज्यात धुमाकुळ घालणारा हारविंधरसिंग ऊर्फ रिधा पि. चरणसिंग संधु रा. गु. गेट. नं. ५ शहिदपुरा नांदेड, याचा साथीदार आकाशसिंह जगतसिंह गाडीवाले, वय ३० वर्षे रा. मगनपुरा नांदेड यांना अटक करण्यासाठी **मा. विजयकुमार मगर**, पोलीस अधिक्षक नांदेड, यांनी सुचना दिल्यावरुन **मा. धनंजय पाटील**, उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा, विभाग यांना व सोबत पथकातील पोलीस अधिकारी पोनि/श्री सुनिल निकाळजे, पोकॉ/शंकर नलबे, महमद गौस समदानी, व्यंकट गांगुलवार, मोहम्मद आलीम, सय्यद सत्तार, शिवाजी डोणगावे, गजानन पायनापल्ले, प्रेमानंद जेंगठे, एकनाथ क्षिरसागर, मनोज नलावले, यांनी पंजाब राज्यात अटक असलेला आकाशसिंह गाडीवाले यास रुपनगर कारागृह चंदीगड येथुन ताब्यात घेतले आहे. आरोपी विरुध्द नांदेड जिल्हयात खालील प्रमाणे गुन्हे केलेले आहेत.

१) पोस्टे विमानतळ गु.रं.नं १८६/२०१६ कलम ३९६, ३०२, १४७, १४८, १४९, १२०(ब) भादंवि सहकलम ३, ४/२५ भाहका मधील मयत नामे बचुत्तरसिंग पि. बाबुसिंग माळी याचा पुर्व दुश्मनीवरुन पिस्टलने फायर करुन खुन केला.

२) पोस्टे वजिराबाद गु.र.नं. २४४/२०१७ कलम मोक्का कलम ३(i)(ii) सह कलम ३८४, ३८६, ३८७, ३४ भादवि व ३/२५ भाहका तसेच

३)पोस्टे वजिराबाद गु.र.नं. २४५/२०१७ कलम ३८४, ३८६, ३८७, ३४ भादंवि

४) पोस्टे वजिराबाद गु.र.नं २४६/२०१७ कलम ३८४, ३८६, ३८७, ३४ भादवि

५) पोस्टे नांदेड ग्रामीण गु.र.नं १७४/२०१९ कलम ३०२, ३९७, ३९८, ३४, भादंवि सह कलम ३/२५ भाहका मोक्का कलम ३(i)(ii)

सदर आरोपीस पोस्टे नांदेड ग्रामीणचा गु.र.नं. १७४/२०१९ या गुन्हयात आज रोजी मा. मोक्का कोर्टात हजर केले असता मा. न्यायालयाने एकुण १० दिवसाची पीसीआर दिलेली आहे. पोलीस कोटडी दरम्यान सदर आरोपीने नांदेड जिल्हयातील विवीध गुन्हयाची उकल होण्याची शक्यता आहे. पुढील तपास एसडीपीओ मा.श्री धनंजय पाटील हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४